Sanskruti International Multidisciplinary Research Journal
IMPACT FACTOR - (IFSIJ) – 5.565 (2020), (CIF)–4.186 (2018)
Special Issue 009 - DRIVE WOMEN TO THRIVE SCIENCE, TECHNOLOGY, COMMERCE AND HUMANITIES (QUEENS OF ERA-2021)
E-ISSN: 2455-1511
April- 2021

# श्री. क्षेत्र चिंतामणी कळंब पर्यटन केंद्र म्हणून विकासाच्या उपाय योजना

**प्रा. एन. व्ही. नरूले**
भूगोल विभाग प्रमुख, इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ
संपर्क क. ९९२३९०९२९६, Mail Id – narulenilkantha3@gmail.com

**सारांश:—**

यवतमाळ जिल्हा कृषीप्रधान म्हणून ओळखला जातो. हा जिल्हा कापूस शेतीसाठी महाराष्ट्रात प्रसिध्द आहे. संपूर्ण जिल्हयात पारंपारिक तसेच आधुनिक पध्दतीने शेती केली जाते. गहू, ज्वारी, कापूस, सोयाबीन, तुरी, शेंगदाने, कांदे, भाजीपाला, ई. प्रकारचे पिके घेतली जाते. शेती बरोबर शेतीवर आधारीत विविध प्रकारची कारखानदारी कमी प्रमाणात विकसित झाली आहे. याच बरोबर पर्यटन क्षेत्रात चांगल्या व नविन स्थळांचा विकास होत आहे. त्यात श्री. क्षेत्र चिंतामणी कळंब पर्यटन क्षेत्र म्हणून विकसित होण्याच्या दृष्टीने हा विषय घेतला आहे. या शोधनिबंधात श्री. क्षेत्र चिंतामणी कळंब पर्यटन क्षेत्र म्हणून विकासाच्या समस्या व उपाय यांचा अभ्यास करण्यात आलेला आहे. सदरच्या शोधनिबंधासाठी आवश्यक असणारी आकडेवारी कळंब ग्रामपंचायत, तलाठी कार्यालय, श्री. चिंतामणी मंदिर देवस्थान संस्था, श्री. निरंजन माहूर संस्था दत्तापूर, श्री. हनुमंत मंदिर रिठ (पार्डी) कोठा, श्री. खटेश्वर महाराज संस्था खटेश्वर, आणि एस. टी. महामंडळ यांचे निरीक्षण करुन संकलित करण्यात आली आहे. आधुनिक युगात मानवी मनाला संस्कार करणा=या विचारांची गरज आहे, ही गरज पूर्ण होवू शकते. महाराष्ट्रातील थोर संतानी सांगितलेल्या मार्गाचा अवलंब केला तरच त्यासाठी त्यांनी लिहलेले अभंग, ओव्या, भजन, किर्तन, प्रवचन, ग्रंथवाचन, पारायण व भगवंताचे नामस्मरण केल्याने सामान्य माणसांच्या मनात भक्तीभाव निर्माण होण्यास मदत होते.

**बीजसंज्ञा:—** भक्तजन, प्रवचन, दर्शन, निवासस्थांन, पर्यटन, पर्यटन विकास

**प्रस्तावना:—**

भारतात पूर्वीपासून धार्मिक स्थळांना महत्व आहे. देशातील विविध धार्मिक व तिर्थक्षेत्राच्या ठिकाणी लाखो भाविक येतात, सध्यातर शहरी व आधुनिक लोकांची भर पडून पर्यटन व्यवसाय भरभराटीला आलेला आहे. महाराष्ट्रात अध्यात्मिक क्षेत्राबरोबर सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतीक थोरांची परंपरा आहे. धार्मिकदृष्टया पर्यटन स्थळे मानवाला सुख समाधान व शांतीचा मार्ग दाखवितात. श्री. क्षेत्र चिंतामणी कळंब येथे वर्षभर भाविक येतात, येणा—या भाविकांना पर्यावरण, शिक्षण, आरोग्य व शेतीचे प्रबोधन झाल्यास त्यांच्या मध्ये परिवर्तन घडेल.

श्री. क्षेत्र चिंतामणी कळंब यवतमाळ जिल्हयातील प्रसिध्द तिर्थक्षेत्र म्हणून ओळखले जाते. महाराष्ट्रातील यवतमाळ, अमरावती, वाशिम, अकोला, बुलडाणा, नागपूर, वर्धा, चंद्रपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली, नांदेड, हिंगोली, परभणी, मराठवाडा इत्यादी जिल्हयातील अनेक लोक येतात. तसेच दर चतुर्थीला यवतमाळ व जवळपासच्या गावातील अनेक लोक पैदल चालत श्री. क्षेत्र चिंतामणी कळंब येथे दर्शनाला येतात.

वर्धा ही नदी या पठारावरील सर्वात मोठी नदी असून वर्धेच्या उगमापासून म्हणजेच सालबर्डीच्या डोंगर रांगापासून अनेक तिर्थक्षेत्र व पर्यटन स्थळे आहेत. त्यात सालबर्डी, मोर्शी येथील अप्पर वर्धा धरण व तेथिल परिसर, अमरावती येथिल एकविरा माता व जगदंबा माता देवस्थान, कौंडिण्यपूर, जहांगिरपूर, पिंपळखुटा, पार्डी येथिल हनुमान मंदिर, श्री. क्षेत्र चिंतामणी कळंब या ठिकाणांना आध्यात्मिक महत्व आहे. श्री. क्षेत्र चिंतामणी कळंब येथेही श्री. गृत्स्मद ऋषींचे वास्तव्य होते, त्यांनी आध्यात्मीक कार्य वर्धा नदीची उपनदी चक्रावती च्या किनारी राहूनच




Scanned with CamScanner

केले. पंढरपूर, पैठण, शेगाव या धार्मिक केंद्राप्रमाणेच श्री. क्षेत्र चिंतामणी कळंब या क्षेत्राचा विकास होऊ शकतो. त्या दृष्टीकोनातून या अभ्यास क्षेत्राची निवड करण्यात आली. अर्थात प्रस्तुत शोध निबंधात केवळ श्री. क्षेत्र चिंतामणी कळंब या केंद्राचा अभ्यास केलेला आहे.

**अभ्यासक्षेत्र:—** श्री. क्षेत्र चिंतामणी कळंब गावाचा अक्षवृत्तीय विस्तार हा २०°२६'उत्तर ते २०°४०' उत्तर आणि रेखावृत्तीय विस्तार ७८° १९' पूर्व ते ७८°३२' पूर्व रेखांश असा आहे. संपूर्ण गावाचा शिवार वर्धा नदीच्या खो—यात पसरलेला आहे. कळंब गावाचे एकूण क्षेत्रफळ ३३२१ हेक्टर आहे. १९८० हेक्टर क्षेत्र पिकाखाली आहे. अधिक क्षेत्र सिंचनाखाली आहे.गावाची एकूण लोकसंख्या (२०११) प्रमाणे १७४४७ असून पुरुष ८८६४ तर स्त्रिया ८५८३ आहेत.

श्री. क्षेत्र चिंतामणी कळंब हे यवतमाळ पासून पूर्व दिशेला २२.५ कि.मी. अंतरावर वर्धेपासून पश्चिमेकडे ४५ कि.मी. अंतरावर असून यवतमाळ ते नागपूर रोडवर असल्यामुळे सतत बसेस सुरु असतात. तसेच टॅक्सी, खाजगी बसेस, मोटारगाडी चालतात. श्री. क्षेत्र चिंतामणी कळंब हे परीसरातील सर्वात मोठे गाव असून तालुक्याचे ठिकाण आहे. त्यामुळे परीसरातील कोठा, वेणी, पार्डी, हिवरादरणे, दोनोडा, मानकापूर, कामठवाडा, डोंगरखर्डा, जोडमोहा, मेटिखेडा, कात्री, तिरझडा, पिंपळगाव, धोत्रा, उमरी, सावरगाव, चिंचोली ई. गावांना शाळा, कॉलेज, बॅंक, आठवडी बाजार, पोलिस स्टेशन, पोस्ट ऑफिस, दवाखाने, पंचायत समिती, तहसिल कार्यालय, आय.टी. आय., एस.टी. बस यासाठी जोडले गेले आहे. या सर्व गावांवर श्री. चिंतामणी च्या श्रध्दास्थानांचा फार मोठा प्रभाव आहे. गावाच्या पूर्वे कडून जवळपास ११ कि.मी. अंतरावरुन वर्धा नदी वाहते, आणि वर्धेची उपनदी चक्रावती ही उत्तर वाहिणी असून तिच्या काठावर कळंब गाव वसलेले आहे. त्यामुळे सोयाबीन, कापूस, तुर, ज्वारी, भाजीपाला, व संत्रा पिकाचे क्षेत्र जास्त आहे, म्हणजेच शेतीप्रधान प्रदेश असल्यामुळे उन्हाळयात देखिल या परिसरातील हवामान थोडे सौम्य स्वरुपाचे दिसून येते.

भगवान श्री. चिंतामणी






श्री. क्षेत्र चिंतामणी कळंब



Scanned with CamScanner

**अभ्यासाची उदिष्टये:–**

प्रस्तुत शोधनिबंधात पुढील उदिष्टांचा विचार करुन अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

१) श्री. क्षेत्र चिंतामणी कळंब पर्यटन केंद्र विकसित करणे.
२) श्री. क्षेत्र चिंतामणी कळंब धार्मिक ठिकाण प्रसिध्दी देणे.
३) श्री. क्षेत्र चिंतामणी कळंब येथे येणा–या यात्रेकरुंच्या सुविधांचा अभ्यास करणे.
४) श्री. क्षेत्र चिंतामणी कळंब पर्यटन केंद्राच्या समस्येचा अभ्यास करत उपाय योजना करणे.

**अभ्यासपध्दती:–**

प्रस्तुत शोधनिंबधासाठी आश्यक असणारी आकडेवारी श्री. क्षेत्र चिंतामणी कळंब नगरपंचायत, तलाठी कार्यालय, पंचायत समिती, श्री. चिंतामणी देवस्थान ट्रस्ट कार्यालयातून संकलित केलेली आहे. मिळालेल्या आकडेवारीवरुन एस. टी. बसने येणारे, खाजगी वाहनाने येणारे यात्रेकरु, श्री. क्षेत्र चिंतामणी कळंब येथील महत्वाची धार्मिक मंदिरे, यात्रेकरु साठी निवास व्यवस्था शोधण्याचा प्रयत्न केला.

**विषय विवेचन:–**

यवतमाळ जिल्हयात कळंब तालुक्याच्या उत्तर मध्य भागात काही गावे धार्मिक दृष्टया महत्वाचे आहे.त्यात श्री. चिंतामणी मंदिर देवस्थान संस्था, कळंब, श्री. निरंजन माहूर संस्था, दत्तापूर, श्री. हनुमंत मंदिर रिठ (पार्डी) कोठा, श्री. खटेश्वर महाराज संस्था, खटेश्वर यांचा समावेश होतो. चक्रावतीच्या तीरावर श्री. गृत्स्मद् ऋषींच्या पावन स्पर्शाने व धार्मिक कार्यातून श्री. क्षेत्र चिंतामणी कळंब गाव यवतमाळ जिल्हयाबरोबरच संपूर्ण विदर्भ व महाराष्ट्रातील जिल्हयापर्यंत परिचीत आहे. प्राचिन मंदिराच्या वारसापैकी एक श्री. क्षेत्र चिंतामणी कळंब आहे. श्री. चिंतामणी देवस्थान ट्रस्ट अनेक वर्षापासून स्थापन असून ट्रस्टींच्या माध्यमातून विकसीत केले आहे. कळंब मध्ये श्री. चिंतामणीचे मंदिर हे फार प्राचिन असून ते जमिनीच्या खाली ३३ फूट खोल आहे. भारतातील २१ गणपतीपैकी एक श्री. चिंतामणीचे मंदिर असून गणपतीचे एकमेव दक्षिणमुखी मंदिर आहे. येथे प्रसिध्द गणेशकुंड देखील आहे, दर बारा वर्षानी गंगा अवतरते अशी आख्यायिका आहे. यवतमाळ जिल्हयात तसेच कळंब तालुक्यात शाळा, दुकाने, ट्रॅव्हलस् कंपनी, श्री. चिंतामणीच्या नावाने चालविली जातात. दर चर्तुथीला भाविकांच्या दर्शनासाठी रांगाच्या रांगा लागतात, त्याचप्रमाणे दरवर्षी फेब्रुवारी महिण्यात गणेश जयतीला श्री. चिंतामणी जन्मोत्सव साजरा करण्यात येतो. या जन्मोत्सवा निमित्त होमहवन, पूजा, धार्मिक कार्यक्रम, प्रवचन, किर्तन, काला, शोभायात्रा, दहिहांडी व महाप्रसादाच्या कार्यक्रमाचे आयोजन मोठया प्रमाणात केले जाते. हा उत्सव जवळपास पंधरा ते विस दिवस चालतो, एकप्रकारे यात्रेचे स्वरुप प्राप्त होते, दुरदुर गावावरुन, जिल्हयातून भक्तगण, लोक दर्शनासाठी येतात. या यात्रेच्या निमित्ताने श्री. क्षेत्र चिंतामणी कळंब येथे २५ ते ३० हजारापेक्षाही जास्त लोक सामिल होतात. याशिवाय वर्षभर धार्मिक संस्काराचे कार्यक्रम होतच असतात, ट्रस्टच्या वतीने भक्तनिवासाचे बांधकाम सुरु केलले आहे.



**प्रवेशव्दार**



Scanned with CamScanner

**श्री. क्षेत्र चिंतामणी कळंब येथे येणा–या यात्रेकरुंचे वितरण:–**

**१) गणेश चर्तुथी–** या १२ महिण्याच्या वर्षभर चालणा–या चर्तुथी असतात, त्यामुळे जिल्हयातून व शेजारी जिल्हयातूनही व परिसरातील भाविक भक्त येतात.

**२) श्रावणातील चर्तुथी–** श्रावणातील चर्तुथीला महत्व आहे. या चर्तुथीलाही मोठया प्रमाणात भाविक येतात, त्यामुळे कळंब नगरी दुमदुमून जाते. दर्शनासाठी रांगाच रांगा लागतात, जिल्हयातून व शेजारी जिल्हयातूनही व परिसरातील भाविक भक्त येतात.

**३) अंगारकी संकष्टी चर्तुथी–** ही वर्षातील फार मोठी चर्तुथी असते. या चर्तुथीलाही विशेष असे महत्व आहे. दुरदुर गावांवरुन, जिल्हयातून भक्तगण, लोक दर्शनासाठी येतात. दर्शनासाठी रांगाच रांगा लागतात, छोटया यात्रेचे स्वरुप या चर्तुथीला पाहायला मिळते.

**४) गणेश जन्मोत्सव–** दरवर्षी फेब्रुवारी महिण्यात गणेश जंयतीला श्री. चिंतामणी जन्मोत्सव साजरा करण्यात येतो. या जन्मोत्सवा निमित्त होमहवन, पूजा, धार्मिक कार्यक्रम, प्रवचन, किर्तन, काला, शोभायात्रा, दहिहांडी व महाप्रसादाच्या कार्यक्रमाचे आयोजन मोठया प्रमाणात केले जाते. हा उत्सव जवळपास पंधरा ते विस दिवस चालतो, एकप्रकारे यात्रेचे स्वरुप प्राप्त होते, दुरदुर गावांवरुन, जिल्हयातून भक्तगण, लोक दर्शनासाठी येतात.

**५) रामनवमी–** श्री. क्षेत्र चिंतामणी कळंब गावात श्रीरामाचे एक मंदिर आहे. रामनवमीच्या दिवशी श्रीराम जन्मोत्सव कळंब गावचे व आजुबाजूच्या गावातील लोक मिळून साजरा करतात. या दिवशी छोटया स्वरुपाची शोभायात्रा काढली जाते.

**६) पंढरपूर दिंडी–** आषाढी वारीसाठी विदर्भातून निघना–या दिंडया विसाव्यासाठी श्री क्षेत्र चिंतामणी कळंब येथे येतात. वारकरी भक्त रात्रभर मंदिरात मुक्कामी असतात, तेव्हा त्यांची सर्व व्यवस्था देवस्थान समिती सांभाळते.

**श्री क्षेत्र चिंतामणी कळंबच्या परिसरातील भक्ती स्थळे:–**

**१) श्री क्षेत्र निरंजन माहूर –** श्री. क्षेत्र चिंतामणी कळंब पासून अवघ्या ५ कि.मी. अंतरावर दत्तापूर या गावी असलेले श्री क्षेत्र निरंजन माहूर श्री दत्त सदगुरुचे एक ठिकाण आहे. चारही बाजूने डोंगर रांगानी वेढलेले, जवळच एक तलाव असून तेथिल दृश्य मनोहारी स्वरुपाचे दिसून येते. अशी आख्यायिका आहे की श्री दत्त सदगुरु आपल्या प्रवासात या ठिकाणी वास्तव्याला होते. त्यामुळेच या ठिकाणाला निरंजन माहूर म्हणून प्रसिध्दी मिळाली. यवतमाळ जिल्हयातून तसेच आदिलाबाद, नांदेड, चंद्रपूर, नागपूर, वर्धा या शेजारी जिल्हयातूनही मोठया प्रमाणावर दर्शनासाठी भक्त येतात. दरवर्षी दत्त जयंतीला छोटीशी यात्रा भरते ती दोन ते तिन दिवस चालते, दर पोर्णिमेला दर्शनासाठी भक्त येतात भजन, किर्तन, करतात, दुस–या दिवशी प्रसाद स्वरुपात अन्नदान करतात. यासाठीच इथे वेगवेगळया महतांचे मठ स्थापन करण्यात आलेले आहेत.

**२) श्री. खटेश्वर महाराज देवस्थान–** श्री. क्षेत्र चिंतामणी कळंब पासून दक्षिणेकडे साधारणपणे २२ कि. मी. व जोडमोहा या गावांपासून २ कि.मी. अंतरावर श्री. खटेश्वर महाराज देवस्थान आहे. हे ठिकाणही डोंगर रांगानी वेढलेले, जवळच एक तलाव असून तेथिल दृश्य नयनरम्य स्वरुपाचे दिसून येते. इथे कार्तिक पोर्णिमेला मोठी यात्रा भरते, दूरदूरवरुन भाविक भक्त दर्शनासाठी येतात, स्वंयपाक करुन अन्नदान करतात.

**३) श्री. हनुमान मंदिर (रिठाचा मारोती) पार्डी (कोठा)–** श्री. क्षेत्र चिंतामणी कळंब पासून उत्तरेकडे बाभूळगावला जाताना साधारणपणे ८ कि. मी. अंतरावर श्री. हनुमान मंदिर (रिठाचा मारोती) देवस्थान आहे. हे एक जागृत देवस्थान असून या मंदिराची स्थापना ३० वर्षापूर्वी श्री. घोटे महाराजांनी केली. इथेही भाविक भक्त दर्शनासाठी व वनौषधी घेण्यासाठी दूरदूरवरुन येतात.



Scanned with CamScanner

Sanskruti International Multidisciplinary Research Journal
IMPACT FACTOR - (IFSIJ) – 5.565 (2020), (CIF)-4.186 (2018)
Special Issue 009 - DRIVE WOMEN TO THRIVE SCIENCE, TECHNOLOGY, COMMERCE AND HUMANITIES (QUEENS OF ERA-2021)
E-ISSN: 2455-1511
April- 2021

कोजागिरी पोर्णिमेला दूरदूरवरुन भाविक भक्त रात्रभर मुककामी राहून औषधीयुक्त दुधाचा आस्वाद घेतात.

**श्री. क्षेत्र चिंतामणी कळंब मधील उपलब्ध सुविधा—**

**वाहतुक:—**

**१) रस्ते वाहतुक—** श्री. क्षेत्र चिंतामणी कळंब हे नागपूर—तुळजापूर राज्यमार्ग क्रमांक २३६ वर वसलेले आहे. नागपूर ते यवतमाळ व यवतमाळ ते नागपूर अर्ध्या — अर्ध्या तासाला एस. टी. बसेस चालतात. श्री. क्षेत्र चिंतामणी कळंब वरुन रस्ते मार्गाने महाराष्ट्रात कुठेही जाता येते.

**२) रेल्वे—** मुंबई — नागपूर या लोहमार्गावर धामणगांव स्टेशन असून धामणगांव ते श्री. क्षेत्र चिंतामणी कळंब अंतर ४० कि.मी. आहे. तसेच मुंबई — नागपूर या लोहमार्गावर वर्धा स्टेशन असून वर्धा ते श्री. क्षेत्र चिंतामणी कळंब अंतर ४५ कि.मी. आहे.

**निवास व्यवस्था—** श्री. क्षेत्र चिंतामणी कळंब येथे येणा—या भाविकांसाठी निवासाची व्यवस्था सध्या कमी प्रमाणात आहे. परंतु श्री. क्षेत्र चिंतामणी देवस्थान ट्रस्ट च्या वतीने भव्य असे भक्त निवासाचे बांधकाम पुर्णत्वास येण्याच्या मार्गावर आहे. उदा. शिर्डी, शेगांव, नांदेड या ठिकाणी येणा—या भाविकांना राहण्याची व भोजनाची चांगली व्यवस्था असल्याने पर्यटक व भाविक मोठया संख्येने वर्षभर राहतात. पुढील एका वर्षात श्री. क्षेत्र चिंतामणी कळंब येथेही येणा—या भाविकांना राहण्याची व भोजनाची चांगली व्यवस्था प्राप्त होईल.

**पर्यटन केंद्र म्हणून विकासासाठी करावयाचे उपाय:—**

**चिंतामुक्ती केंद्र सुरु करावे—** श्री. क्षेत्र चिंतामणी कळंब येथे वर्षभर हजारो भाविक दर्शनासाठी येतात, वास्तव्याला राहतात, तेंव्हा शेगावच्या धर्तीवर आनंदसागर सारखे एखादे परंतु छोटया स्वरुपाचे ध्यानकेंद्र, बगिचा, छोटया मुलांसाठी प्लेपार्क ई. अनेक गोष्टीने सुसज्य असे चिंतामुक्ती केंद्र सुरु करावे. यामुळे पर्यटनाला चालना मिळेल व उत्पन्न वाढून पर्यटन केंद्र विकसित होण्यास मदतच होईल.

**बोटिंग सुरु करावी—** श्री. क्षेत्र चिंतामणी कळंब पासून अवघ्या ५ कि.मी. अंतरावर दत्तापूर या गावी असलेले श्री क्षेत्र निरंजन माहूर श्री दत्त सदगुरुचे एक ठिकाण आहे. चारही बाजूने डोंगर रांगानी वेढलेले, जवळच एक तलाव असून तेथिल दृश्य मनोहारी स्वरुपाचे दिसून येते. त्याला दततापूर चा तलाव असे म्हणतात. इथे एक बंधारा बांधलेला आहे, येथिल साठलेल्या पाण्यावर बोटिंगची सोय करुन शासनाची परवानगी घेऊन अनुभवी ठेकेदारांकडून बोटिंगसाठी व्यवस्था केल्यास येणारे पर्यटक यांना बोटिंगचा अनुभव नक्कीच चांगला राहील. यामुळे परिसरातील शालेय विद्यार्थी यांचे सहलींचे प्रमाण वाढेल. यामुळे पर्यटनाला चालना मिळेल व उत्पन्न वाढून पर्यटन केंद्र विकसित होण्यास मदत होईल.

**रेल्वे मार्ग लवकर निर्माण करावा—** श्री. क्षेत्र चिंतामणी कळंब वरुन सध्यातरी रस्ते मार्गाने महाराष्ट्रात कुठेही प्रवास करता येतो. परंतु रेल्वे मार्गाचा विकास न झाल्यामुळे पर्यटन केंद्र म्हणून मोठया प्रमाणावर विकसित झालेले नाही. त्याचसाठी सेवाग्राम(वर्धा)—कळंब—यवतमाळ—दिग्रस—पुसद—उमरखेड—नांदेड हा नियोजित रेल्वे प्रकल्प लवकरात लवकर सुरु झाल्यास वाहतुकीची कोंडी कमी होईल. कमी अंतराचा व वेळेचा एक मार्ग तयार होऊन त्याचा लाभ श्री. क्षेत्र चिंतामणी कळंब या पर्यटन क्षेत्रास होऊ शकतो.

**भक्त निवास लवकर निर्माण करावा—** श्री. क्षेत्र चिंतामणी कळंबला येणा—या लांबच्या भक्तांसाठी, त्यांना वास्तव्यासाठी भक्तनिवास आवश्यक आहे. त्याचे निर्माण होऊ घातलेले आहे, ते लवकरात लवकर भक्तांसाठी राहण्यास चालू करावे.यामुळे पर्यटनाला चालना मिळेल व उत्पन्न वाढून पर्यटन केंद्र विकसित होण्यास मदतच होईल.



Scanned with CamScanner

**चक्रावती नदीचे सौंदर्यीकरण—** श्री. क्षेत्र चिंतामणी कळंब गावातून मधोमध चक्रावती नदी ही उत्तरवाहीनी बनून वाहते. या नदीला नेहमी स्वच्छ ठेऊन तीची खोली कायम ठेवण्याचा प्रयत्न झाला पाहिजे, म्हणजेच पाण्याची पातळी टिकून राहिल. तसेच नदीच्या दोन्ही तिरावर वृक्ष लावून सौंदर्यीकरण करुन सुशोभिकरण करण्यावर भर दिल्यास पर्यटनाला चालना मिळेल व उत्पन्न वाढून पर्यटन केंद्र विकसीत होण्यास मदतच होईल.

**निष्कर्ष:—**

१) श्री. क्षेत्र चिंतामणी कळंब पर्यटन केंद्र म्हणून विकसीत केल्यास कळंब तालुक्यातील व यवतमाळ जिल्हयातील एक चांगले तिर्थक्षेत्र व पर्यटन क्षेत्र म्हणून विकास होण्यास वरील उपाययोजना अस्तीत्वात आणल्या जाव्यात.

२) श्री. क्षेत्र चिंतामणी कळंब पर्यटन केंद्र म्हणून विकसीत केल्यास पर्यटन व्यवसायातून गांव व परीसरातील नागरीकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. उदा. हॉटेल, वाहतूक व्यवसाय.

३) पर्यटक व भाविकांसाठी चांगल्या प्रकारचे भक्त निवास व भोजन व्यवस्था करण्यात यावी.

४) भक्तांसाठी स्नानगृह व शौचालय व्यवस्था करण्यात यावी.

५) चक्रावती नदीवरील घाटाचे सुशोभिकरण करावे. लाईटची व्यवस्था करण्यात यावी.

६) शुध्द व स्वच्छ पाणी पुरवठयाची व्यवस्था करावी.

७) विविध ठिकाणांची माहिती देणारे बोर्ड तयार करावे. त्यातून भाविकांना व पर्यटकांना चांगली माहिती मिळेल.

८) आठवडी बाजार मंदिरा पासून दूर ठिकाणी भरवावा, जेणेकरुन मंदिर परीसर स्वच्छ व सुंदर राहील.

९) अधिक चांगल्या योजनांसाठी शासकीय पातळीवर पाठपुरावा करण्यात यावा.

**संदर्भ ग्रंथ:—**

१. प्रा. संतू शिनगर—(२०११) श्रीक्षेत्र खेडलेझुंगे पर्यटन केंद्र म्हणून विकासाच्या उपाय योजना मभूप संशोधन पत्रिका खंड २८, अंक—१ पृष्ठ २१.

२. श्री. क्षेत्र चिंतामणी कळंब नगरपंचायत अहवाल.

३. दैनिक सकाळ—यवतमाळ २१एप्रिल २०२१.



Scanned with CamScanner